जा.क्र./म.स.के./~~महामार्ग~~/ 681 /२१
~~जाहीर~~ विभाग, म.स.के.
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला
दि. 27/8/2021

## जाहीर लिलाव नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत महामार्ग विभाग येथील एका शेततळयाचा मत्स्य पालन/व्यवसाय करिता जाहीर लिलाव दिनांक ....09/09/2021.... रोजी ~~दुपारी~~ सकाळी ....10.30....वाजता महामार्ग विभागाचे प्रांगणात करण्यात येणार आहे.

तरी सर्व इच्छुक व्यक्तींनी महामार्ग विभाग येथे वरील वेळेत बोली बोलण्याकरिता उपस्थित राहावे. लिलावाचे नियम व अटी कार्यालयीन वेळेत या कार्यालयामध्ये पहावयास मिळतील.

प्रभारी अधिकारी
महामार्ग विभाग, म.सं.के.
डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला

## जाहीर लिलावाच्या अटी

महामार्ग विभागावरील परिसरातील एका शेततळ्याचा मत्स्य पालन/व्यवसाय करिता जाहीर लिलाव दिनांक 09/09/2024 रोजी ~~दुपारी~~ सकाळी 10:30 वाजता महामार्ग विभागावर करण्यात येत आहे. त्या लिलावाच्या अटी खालील प्रमाणे आहेत.

- महामार्ग विभागावरील एका शेततळ्याचा फक्त मत्स्य पालन/व्यवसाय करिता समावेश आहे.
- ज्यांना लिलावामध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांना रुपये 1000/- नगदी अनामत रक्कम म्हणून नगदी भरावे लागतील.
- ज्या व्यक्तींनी रुपये 1000/- अमानत रक्कम भरली असेल त्यांना फक्त लिलावाच्या वेळी प्रक्षेत्रावरील ठिकाणी हजर राहता येईल. कोणत्याही व्यक्तीस लिलावाच्या वेळी स्थळी थांबता येणार नाही. विभागावरील लिलाव समितीचे सदस्य व कार्यालयीन कर्मचारी लिलावाच्या ठिकाणी राहतील.
- लिलावाची अपेक्षित किमत आल्याशिवाय लिलावाच्या बोली मान्य करणे अथवा नाकारणे हे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.
- बोली बोलणाऱ्या पैकी ज्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली असेल त्याला लिलाव समिती मान्यता देईल व ह्याबाबतचा अंतिम निर्णय मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला ह्यांचे मंजुरी नंतर हि बोली मान्य अथवा अमान्य असल्याची लिलावाच्या तारखेपासून तीन दिवसाचे आत संबधित ठेकेदार/व्यापारी यास सूचित करणायत येईल.
- लिलावास अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर त्या खरेदीदारास त्या बाबतची सूचना मिळाल्यानंतर लिलावाची ७५% रक्कम त्वरीत भरावी लागेल, व उर्वरित २५% रक्कम सात दिवसांचे आत भरावी लागेल.
- खरेदीदारास अंतिम बोलीच्या १० टक्के रक्कम security deposit म्हणून जमा करावी लागेल. सदर रक्कम लिलावाची मुदत संपल्यानंतर खरेदीदाराने रीतसर अर्ज करून व पावती जोडून परत करून घ्यावी.
- मत्स्य पालन/व्यवसाय करतांना कोणतीही हानी पोहोचणार नाही याची दक्षता ठेकेदारास घ्यावी लागेल. विद्यापीठ मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई करून द्यावी लागेल अन्यथा security deposit जप्त करण्यात येईल. व ह्या बाबतचा अंतिम निर्णय संचालक , मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला यांचे कडे राहील.
- शेततळ्याचा मत्स्य पालन/व्यवसाय करिता अंतिम बोलीस मान्यता मिळाल्यानंतर खरेदीदारास रु. १००/- च्या stamp पेपर वर करारनामा करून द्यावा लागेल.
- ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर बोली बोलणारे हजर नसल्यास लिलाव रद्द करण्यात येईल तसेच तीन पेक्षा कमी बोली बोलणारे हजर असल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव समिती घेईल.
- मत्स्य पालन/व्यवसाय करण्याकरिता मत्स्य बीज व मत्स्य खाद्य टाकण्याची पूर्ण जबाबदारी खरेदीदाराची राहील.

- मत्स्य पालन/व्यवसाय करतांना त्याच्या सुरक्षेबाबतची संपूर्ण जबाबदारी खरेदीदाराची राहील. चोरी होणे, नैसर्गिक हानी, जीवित हानी झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
- खरेदीदाराने रखवाली करिता ठेवणाऱ्या व्यक्तीची माहिती प्रभारी अधिकारी महामार्ग विभाग यांना द्यावी लागेल व त्यांचेकडून त्यांना गेटपास देण्यात येईल. प्रक्षेत्रावर फक्त गेटपास धारकांना प्रवेश राहील.
- मत्स्य / मासोळी काढून नेण्याची अंतिम तारीख 30/04/2022 राहील.

प्रभारी अधिकारी
महामार्ग विभाग, म.सं.के.
डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला.

टिप्पणी
सविनय सादर,